**कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना**

महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ३८ /२०२५ दि. १५ /०३/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** कल्याण – डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोळसेवाडी वाहतुक उप विभाग हद्दीत घरडा सर्कल, डोंबिवली पूर्व या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव निमीत्त ( तिथिप्रमाणे ) पुर्णाकृती अश्वरूढ पुतळयाचे अनावरण कार्यक्रम दिनांक १७/०३/२०२५ रोजी १६:०० ते २२:०० वा.चे दरम्यान पार पडणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद** :– १) डोंबिवली स्टेशन, चार रस्ता, टिळक चौक, शेलारनाका मार्गे घरडा सर्कलकडे येणाऱ्या सर्व वाहनांना **शिवम हॉस्पीटल, डोंबिवली पुर्व** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– सदर वाहने शिवम हॉस्पीटल येथुन उजवीकडे वळुन जिमखाना रोड, सागर्ली मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद** :– २) सुयोग रिजन्सी अनंतम, पेंढारकर कॉलेज मार्गे घरडा सर्कलकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना **आर.आर. हॉस्पीटल, डोंबिवली पुर्व** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– सदर वाहने आर.आर. हॉस्पीटल येथुन डावीकडे वळुन कावेरी चौक, एम.आय.डी.सी. मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद** :– ३) खंबाळपाडा रोड, ९० फुट रस्ता, ठाकुर्ली रोड कडुन बंदीश पॅलेस हॉटेल मार्गे घरडा सर्कलकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना **बंदीश पॅलेस हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– सदर वाहने बंदीश पॅलेश हॉटेल येथून सावित्रिबाई फुले नाट्यगृह, पेंढारकर कॉलेज मार्गे व खंबाळपाडा रोड, ठाकुर्ली, ९० फीट मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद** :– ४) आजदेगावमधून घरडा सर्कल कडे येणाऱ्या सर्व वाहनांना **आजदेकमान** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– सदर वाहने आजदेगाव एम.आय.डी.सी अंतर्गत रस्त्यामार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद** :– ५) आजदेपाडा कमान मार्गे घरडा सर्कल केडे येणाऱ्या सर्व वाहनांना **घरडा सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– सदर वाहने आजदेकमान येथून डावीकडे वळण घेवून शिवम हॉस्पीटल, जिमखाना मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि.१६/०३/२०२५ रोजी रात्रौ २२:०० ते दि.१७/०३/२०२५ रोजी रात्रौ २३.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर,</u>**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner